**वादी तर्फे सा.क्र.५ चा अतिरिक्त सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**३.** आता मला मयत थळू कांबळे याने करुन दिलेले मृत्यूपत्र दाखवले, त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. त्याला नि. क्र.४७ देण्यात आलेला आहे.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी तर्फे उलट तपास – श्री. जे. जी. दिडबाग वकील.**

**४.** मी आजरा वन विभागात नोकरीला आहे. माझ्या कामाची वेळ सायंकाळी ०६.०० ते सकाळी ०६.०० पर्यंत असते. दि.१९.०४.२०२२ रोजी देखील माझी रात्रपाळी होती. मसोली गावापासून देवर्डे गाव अडीच कि. मी. अंतरावरती आहे. माझे देवर्डे गावातील कांबळे परिवारामध्ये कोणतेही नातेवाईक नाहीत. मला मयत थळू याला दोन पत्नी असल्याची माहिती नाही.

प्रश्न – तुम्हाला काय मजकूराचे मृत्यूपत्र लिहिले आहे याबाबत माहिती आहे काय ?

उत्तर – थळूने त्याच्या मुलीला मृत्यूपत्र करुन दिले आहे.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रावरती स्वाक्षरी करण्यापूर्वी मृत्यूपत्र वाचून पाहिलेले नाही. मला त्या मृत्यूपत्रामध्ये नि. दि. दा. क्र.१३/२००५ आणि नि. दि. अ. क्र.३०/२०११ चा उल्लेख असल्याचे आठवत नाही. मला मयत थळू व त्याची मुलगी शालन यांच्या थळूच्या दुस–या पत्नी व तिच्या मुलासोबत चालू असलेल्या न्यायालयीन प्रकरणाची माहिती नाही. मला मयत थळूच्या नातेवाईक आणि वारसां संबंधी माहिती नाही. सदरचे मृत्यूपत्र गट क्र.५२३, १९४ आणि १६४ च्या मिळकती साठी करण्यात आले होते.

**६.** मला गट क्र.५२३ व १६४ च्या जमिनी मयत थळूच्या नावे नसल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे मृत्यूपत्र दि.१८.०४.२०२२ रोजी लिहून ठेवलेले असल्यामुळे त्यावरती दि.१८.०४.२०२२ तारीख टंकलिखित करण्यात आली आहे. मला सदर मृत्यूपत्राच्या पान क्र.२ वर पान क्र.५ वरील दि.१८.०४.२०२२ च्या तारखेतील १८ या अंकामध्ये कोणी खाडाखोड केली आहे याची माहिती नाही. मी नि. क्र.४७ वरील पान क्र.६ वरती असलेली माझी स्वाक्षरी दुय्यम निबंधक कार्यालयात

दस्त नोंदवताना केलेली आहे. सदरचा दस्त त्या दिवशी दुपारी ०३.०० ते ०४.०० वाजेच्या दरम्यान नोंदवण्यात आला होता.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२०.०४.२०२२ रोजी दुय्यम निबंधक, आजरा यांच्या कार्यालयात गेलो नव्हतो. मी केवळ एकदाच दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे व वादी शालनचे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्र करतेवेळी थळू कांबळेला त्याचे वय झालेले असल्यामुळे लिहिता– वाचता येत नव्हते. मला थळू कांबळे स्वाक्षरी करत होता याची प्रत्यक्ष माहिती नाही. थळूने मृत्यूपत्रावरती निशाणी अंगठा केलेला असून त्याला आर. डी. सावंत वकिलांनी दस्तूर दिला आहे.

८. हे म्हणणे खरे नाही की, थळूची मृत्यूपत्र लिहिण्या इतपत शारिरीक व मानसिक स्थिती चांगली नव्हती. मला थळू कशाने मयत झाला याची माहिती नाही. मी थळूच्या अंत्यविधीला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र.४७ वरती थळूचा निशाणी अंगठा नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व तिच्या आईने थळूच्या दुस–या पत्नीच्या मुलाचा हक्क डावलण्यासाठी माझ्याशी संगनमत करुन मृत्यूपत्राचा खोटा दस्त केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला मदत करण्यासाठी त्यांनी तयार केलेल्या मृत्यूपत्रावरती स्वाक्षरी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०७.०४.२०२६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.